# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०१/०५/२०१८

**ग्रामीण पोलीस मुख्यालयात मा.पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्राप्त कर्मचा-यांचा गुणगौरव सोहळा संपन्न**

---

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात उत्कृष्ट सेवा बजावणा-या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचा दरवर्षी विविध पदकांनी सन्मान केला जातो. या विविध सन्मानांपैकी मा.पोलीस महासंचालक पदक महत्वाचे मानले जाते. चालु वर्षात नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील १० पोलीस कर्मचा-यांना पोलीस विभागात विविध प्रकारच्या कर्तव्यामध्ये उत्तम कामगिरी केल्याबद्दल मा.पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहिर झाले आहे. आज दिनांक ०१ मे २०१८ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन सन्मानचिन्ह प्राप्त कर्मचा-यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

आज रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांचे हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आवारात ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा.पोलीस अधीक्षकांचे हस्ते पोलीस महासंचालक सन्माचिन्ह प्राप्त कर्मचा-यांचा गुणगौरव सोहळा पार पडला. ग्रामीण पोलीस दलाचे आस्थापनेवरील १) सपोउनि बाळु जाधव, २) सपोउनि टिल्लु सानप, ३) पोहवा मधुकर तारू, ४) पोहवा कैलास कपिले, ५) पोहवा मधुकर आथरे, ६) पोहवा रमेश पाटील, ७) पोहवा विनय देवरे, ८) पोहवा प्रकाश तुपलोंढे, ९) पोहवा विजय देवरे, १०) पोना विनायक जोलु वळवी असे एकुण १० पोलीस कर्मचा-यांना मा.पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहिर झाले आहे. नमुद कर्मचारी यांना आज रोजी **मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे हस्ते पोलीस महासंचालक सन्मानचिन्हे प्रदान करण्यात येवुन गौरविण्यात आले. यावर्षी ग्रामीण पोलीस दलातील एकुण १० पोलीस कर्मचा-यांना सन्मानचिन्हे जाहिर झाल्याने पोलीस दलातुन अभिनंदन होत आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आवारात पार पडलेल्या गुणगौरव सोहळयास नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो, अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उपअधीक्षक आगुशा श्री. देशमुख, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. अशोक करपे, पोलीस निरीक्षक मानव संसाधन विभाग श्री. यादव, यांचेसह पोलीस मुख्यालयातील अधिकारी व कर्मचारी हजर होते. दरम्यान सन्मानचिन्ह प्राप्त कर्मचा-यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.